महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १८९ दिनांक १७ / ११ / २००८

विषय : म.रा.वि.वि.कंपनीतील अधिकारी/कर्मचारी यांना मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेपूर्वी व शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणाऱ्या "डायलिसीस" या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

संदर्भ : सामान्य आदेश क्र. २० (क), दिनांक १७/०६/१९६३.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना सा.आ.क्र.२०(क), दिनांक १७/०६/१९६३ (वेळोवेळी सुधारित केलेल्या) मध्ये समाविष्ट केलेल्या गंभीर आजारांवर उपचार/शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती देण्यात येते. महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेपूर्वी व शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणाऱ्या 'डायलिसीस' या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) व संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करून मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेपूर्वी व शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणाऱ्या 'डायलिसीस' या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय करण्याबाबत मंजुरी प्रदान केली आहे.

३. मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेपूर्वी व शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणाऱ्या 'डायलिसीस' उपचारावरील खर्च प्रतिपूर्ती मर्यादा ही जसलोक रुग्णालय, मुंबई येथे आकारण्यात येणाऱ्या रकमेच्या मर्यादेपर्यंत किंवा प्रत्यक्षात झालेला खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढ्या रकमेची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. अशा 'डायलिसीस' खर्च प्रतिपूर्तीची काही प्रलंबित प्रकरणे असल्यास ती या तरतुदीनुसार निकाली काढावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु. य. पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रति :

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir – Medical-29*
*10/11/2008*